# जाहिरात प्रारुप
## राष्ट्रीय आरोग्य अभियान, जिल्हा परिषद, अमरावती.
### नोंदणी क्र. ७३६/०५

## कंत्राटी पदाकरीता थेट पदभरती

राष्ट्रीय आरोग्य अभियान अमरावती अंतर्गत जिल्हा व तालुका स्तरावर खालील कंत्राटी पदे पदभरतीव्दारे भरावयाची आहे, याकरीता इच्छुक उमेदवारांनी सोबत जोडलेल्या अर्ज नमुन्यानुसार आवश्यक शैक्षणीक कागदपत्रांसह खालील वेळापत्रानुसार कार्यालयीन वेळेत अर्ज सादर करावा.

रिक्त पदाचा तपशील पुढील प्रमाणे आहे

| पद क्र. | पदनाम | शैक्षणिक अहर्ता | एकुण रिक्त पदे | आरक्षित रिक्त पदाचा तपशील | वयोमर्यादा | एकत्रित मासिक मानधन | रिक्त पदांचे ठिकाण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | वैद्यकीय अधिकारी Medical Officer (Cadre – MO RBSK Male) | BAMS | 8 | ST-2<br>VJA-1<br>NT-D-1<br>OBC-1<br>EWS-3 | ३८ वर्ष खुला प्रवर्ग/ मागासवर्गीय उमेदवाराकरीता ४३ वर्ष | Rs. 28,000/- | THO Amravati- 1<br>SDH Dharni-3<br>RH Anjangaon Surji-1<br>RH Dhamangaon Rly-1<br>RH Chikhaldara-1<br>THO Bhatkuli-1 |
| २. | वैद्यकीय अधिकारी Medical Officer (Cadre – MO RBSK Female) | BAMS | 11 | SC-3<br>ST-2<br>VJA-1<br>NT-B-1<br>SBC-1<br>EWS-3 | ३८ वर्ष खुला प्रवर्ग/ मागासवर्गीय उमेदवाराकरीता ४३ वर्ष | Rs. 28,000/- | SDH Dharni-4<br>SDH Achalpur-1<br>RH Anjangaon Surji-2<br>RH Warud-1<br>RH Chikhaldara-3 |
| ३ | वैद्यकीय अधिकारी Medical Officer (Cadre – MO Neonotal Ambulance) | BAMS | 6 | SC/ST-1<br>VJA/NTB/NTC/NTD - 1<br>SBC/ EWS-1<br>OBC-1<br>OPEN-2 | ३८ वर्ष खुला प्रवर्ग/ मागासवर्गीय उमेदवाराकरीता ४३ वर्ष | Rs. 28,000/- | SDH Dharni-3<br>RH Chikhaldara-3 |
| | **Total Post** | | **25** | | | | |

सविस्तर जाहिरात अटी व शर्तीसह ***https://zpamravati.gov.in*** वर उपलब्ध आहे

**आवश्यक कागदपत्रे :-** खालील कागदपत्रांची मुळ प्रतीची छायांकित प्रत स्वसाक्षांकीत करुन अर्जासोबत सादर करणे अनिवार्य राहील.

१) पदवी/पदविका प्रमाणपत्र २) गुणपत्रिका (सर्व) ३) शैक्षणिक अर्हतेबाबतची प्रमाणपत्र,
४) तांत्रिक पदाकरीता तत्सम कॉन्सीलचे रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र ५) संगणक अहर्तचे प्रमाणपत्र ६) जातीचे प्रमाणपत्र
७) शाळा सोडल्याचा दाखला/जन्मतारखेचा दाखला ८) प्रमाणित केलेले अनुभव प्रमाणपत्र
९) पासपोर्ट आकाराचा फोटो.
१०) कोविड-१९ मध्ये काम केल्याचे अनुभव प्रमाणपत्र (जिल्हास्तरीय अधिकारी यांच्या स्वाक्षरीचे)
११) मेळघाट क्षेत्रामध्ये रहिवासी असल्याचा दाखला.

**अर्ज सादर करण्याचा अंतिम दिनांक** :- 12/05/2023 ते 18/05/2023 सायंकाळी ५.०० पर्यंत. (शासकिय सुट्टीचे दिवस वगळून)

**पात्र, अपात्र उमेदवारांची यादी प्रसिध्द** :- 22/05/2023 सायंकाळी ५.०० पर्यंत.

**आक्षेप सादर करण्याचा अंतिम दिनांक**:- 24/05/2023, सायंकाळी ५.०० पर्यंत.

**अर्ज सादर करण्याचे स्थळ** :- राष्ट्रीय आरोग्य अभियान जिल्हा कार्यालय, जिल्हा सामान्य रुग्णालय परिसर, इर्विन चौक, अमरावती.

जिल्हा आरोग्य अधिकारी
जिल्हा परिषद,अमरावती

जिल्हा शल्य चिकित्सक
जिल्हा सामान्य रुग्णालय, अमरावती

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद, अमरावती

Scanned with OKEN Scanner

**अटी व शर्ती :-**

१) वरील पदे ही पुर्णपणे कंत्राटी स्वरुपाची असुन त्यांचा कालावधी दि.२९/०६/२०२३ पर्यंत मर्यादीत आहे. हा कालावधी वाढविला जाण्याची शक्यता आहे परंतु सदर पदावर कायमपणाचा हक्क राहणार नाही. तसेच या पदासाठी शासनाचे सेवा नियम लागु नाहीत. (राज्यस्तरीय पत्र क्र.११०६८८-९३६, दि.०३/०१/२०२२)

२) ही पदे राज्य शासनाची नियमित पदे नसुन निव्वळ कंत्राटी स्वरुपातील पदे आहेत. सदर पदावर कायमपणाचा हक्क राहणार नाही. तसेच अर्जदाराला शासकीय नियमित सेवेत सामावुन घेणे किंवा शासनामार्फत सेवा संरक्षण किंवा त्यासबंधी दावा करण्याचा अधिकार राहणार नाही.

३) अर्जदार हा सबंधीत पदासाठी शारीरीक व मानसिकदृष्ट्या सक्षम असावा, अर्जदाराविरुध्द कोणताही फौजदारी गुन्हा दाखल झालेला नसावा.

४) उपरोक्त सर्व पदासाठीचे वेतन हे एकत्रित मानधन आहे.

५) सदर रिक्त पदांच्या संख्येत, ठिकाण व मानधनात बदल होवु शकतो.

६) अनुभवी व उच्च शैक्षणिक अर्हता धारकास प्राधान्य दिले जाईल.

७) जाहिरात प्रसिध्दीच्या दिवशी सदर पदासाठी कमाल वयोमर्यादा खुल्या प्रवर्गासाठी ३८ वर्ष मागासवर्गीय प्रवर्गासाठी ४३ वर्ष राहील. राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत कार्यरत कर्मचारी यांना ५ वर्ष शिथील राहील.

८) उपरोक्त पदाकरीता निवड प्रक्रिया ही थेट गुणवत्तेनुसार घेण्यात येत असल्यामुळे जाहीरातीमधील नमुद दिनांकास विहीत कालावधीत सोबत दिलेल्या अर्ज नमुन्यात मुळ शैक्षणिक कागदपत्राच्या सत्यप्रतीसह या कार्यालयात अर्ज सादर करावा, त्यानंतर प्राप्त होणारे अर्ज स्विकारल्या जाणार नाहीत.

९) संबधित पदाकरीता नोदणी नंतर पात्र, अपात्र यादी प्रसिध्द दिनांकास कार्यालयात सुचना फलकावर प्रसिध्द करण्यात येईल. त्यासंबधी आक्षेप नमुद दिनांकास सकाळी १० ते ५ पर्यंत घेवुन निराकरण केले जाईल. त्यानंतर प्राप्त आक्षेपाचा विचार केला जाणार नाही.

१०) अर्जदाराला सोईनुसार ठिकाण बदलवुन मिळण्याची मागणी करता येणार नाही.

११) उमेदवारास एकापेक्षा जास्त पदाकरीता अर्ज सादर करावयाचे असल्यास प्रत्येक पदाकरीता स्वतंत्र अर्ज करावे लागेल. अर्ज करीत असलेल्या पदाचे नाव व सामाजिक आरक्षणानुसार सदर पदाकरीता नमुद प्रवर्ग (जातीचे प्रवर्ग) अर्जामध्ये स्पष्टपणे नमुद करावा आणि अर्ज हे सोबत जोडलेल्या नमुन्यातच सादर करण्यात यावे.

१२) उमेदवारांनी अर्जासोबत कागदपत्रे अपूर्ण जोडल्यास उमेदवारास अपात्र ठरवल्या जाईल.

१३) भरती प्रक्रिया स्थगिती देणे/रद्द करणे/ पदभरती प्रक्रियेत बदल करण्याचे सर्व अधिकार मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे स्तरावर राखीव ठेवण्यात आलेले आहेत. याबाबत कोणत्याही प्रकारचा दावा करता येणार नाही.

१४) उमेदवारांना प्रवासभत्ता अथवा इतर कुठलाही भत्ता देय राहणार नाही.

१५) जाहिरातीमध्ये प्रसिध्द करण्यात आलेल्या पदाकरीता अर्ज सादर केलेल्या पात्र उमेदवारांची खालीलप्रमाणे निवडीकरीता गुणांकन करण्यात येईल.

अ) शैक्षणिक अंतीम वर्षाचे गुणांच्या ५०%

ब) पदवीत्तर पदवी असल्यास अतिरिक्त २० गुण देण्यात येतील.

क) उमेदवारास शासकिय, निमशासकिय व राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत पगारी काम केल्याचा अनुभव असल्यास प्रत्येक वर्षासाठी ६ गुण याप्रमाणे जास्तीत जास्त ३० गुण देण्यात येतील. **वरिलप्रमाणे १०० पैकी गुणांकन करण्यात येईल.**

१६) भविष्यामध्ये मा. सहाय्यक आयुक्त यांच्या बिंदूनामावलीप्रमाणे आरक्षणामध्ये बदल झाल्यास उमेदवारांना कोणतीही पूर्व सुचना न देता कामी करण्यात येईल.

१७) उमेदवारांची निवड ही अ.क्र. १५ वरिल गुणवत्तेनुसार करण्यात येईल.

१८) ज्या तांत्रिक संवर्गातील पदांना विहित केलेल्या केंद्रशासन अथवा राज्यशासनाच्या नोंदणी विभागाकडून वैध असलेले नोंदणी प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक असल्यामुळे अर्जासोबत वैध नोंदणी प्रमाणपत्र जोडणे अनिवार्य राहील.

१९) शासकिय सेवानिवृत्त अधिकारी यांचेकरीता वयोमर्यादा ६२ वर्षे असेल. तसेच अनुभवास प्राधान्य असेल. वर्ग-३ व वर्ग-४ च्या पदावरुन निवृत्त झालेले कर्मचारी कंत्राटी पदावर अर्ज करण्यासाठी दि.१७.१२.२०१६ रोजीच्या शासननिणर्याव्दारे अपात्र आहेत.

Scanned with OKEN Scanner

२०) सेवानिवृत्त उमेदवारांना मानधन शासननिर्णय क्र.: सकिंर्ण- २७१५/प्र.क्र./१००/१३ दि.१७.१२.२०१६ नुसार अदा करण्यात येईल.

२१) सेवानिवृत्त अधिकारी / कर्मचारी यांचे विरुध्द कोणतीही विभागीय चौकशीची कार्यवाही चालु किंवा प्रस्तावित नसावी किंवा कोणत्याही प्रकारे फौजदारी प्रकरण नसावे.

२२) मेळघाट क्षेत्रातील आरोग्य संस्थामधील पदाकरीता मेळघाट मधील स्थानिक रहिवासी उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल. त्याकरीता मेळघाट मधील स्थानिक रहिवासी असल्याबाबत शासकिय पुरावा सोबत जोडणे अनिवार्य राहील. **(उदा. राशन कार्ड, ग्रामपंचायत सचिव रहीवासी दाखला, डोमेसियल प्रमाणपत्र, तहसीलदार कार्यालयाचे प्रमाणपत्र)**

२३) महाराष्ट्र नागरी सेवा नियम २००५ अन्वये लहान कुटुंबाचे प्रमाणपत्र नमुना-अ या प्रपत्रात अर्जासोबत सादर करणे आवश्यक राहील.

२४) उमेदवाराने अधिवास व राष्ट्रीयत्वाचे सक्षम अधिकाऱ्याकडून प्राप्त केलेले प्रमाणपत्र अर्जासोबत सादर करणे अनिवार्य राहील.

२५) उमेदवराने ए-४ आकाराच्या कागदावर संगणीकृत किवा टंकलिखीत केलेल्या सोबत जोडलेल्या विहीत नमुन्यातील अर्जातच परिपुर्ण माहीती भरुन संपुर्ण आवश्यक दस्ताऐवजासह भरतीप्रक्रियेच्या वेळापत्रकानुसार पदनिहाय दिलेल्या पत्यावर नोंदणीकृत डाकेने अथवा सक्षम सादर करावे. नमुद मुदतीनंतर प्राप्त झालेले अर्ज किवा हरकती यांचा कोणत्याही प्रकारे विचार केला जाणार नाही.

२६) पदभरती प्रक्रियेबाबत उमेदवारांना स्वतंत्रपणे लेखी स्वरुपात कळविण्यात येणार नाही. याबाबत ***https://zpamravati.gov.in*** या संकेतस्थळावर वेळोवेळी होणाऱ्या प्रक्रियाबाबत जाहीर करण्यात येईल, याबाबत कोणत्याही प्रकारच्या तक्रारीची दखल घेतली जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

२७) शासन निर्णय दि.१३ जानेवारी २००९ नुसार खुला (अमागास) अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती प्रवर्ग वगळता इतर मागास प्रवर्गातील उमेदवारांनी आरक्षणाचा लाभ मिळण्यासाठी दि.३१ मार्च २०२४ पर्यंत वैध असलेले उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे (नॉनक्रिमीलेअर) प्रमाणपत्र अर्जासोबत जोडणे आवश्यक राहील.

२८) सामान्य प्रशासन विभागाचा शासन निर्णय दि.०६/०७/२०२१ नुसार SEBC प्रवर्गातील उमेदवारांनी खुल्या किंवा EWS प्रवर्गात अर्ज करावा.

**२९) निवड यादीतील उमेदवारांना गुणानुक्रमानुसार नियुक्ती दिली जाईल. त्याबाबत उमेदवारांनी कुठल्याही दबावतंत्राचा वापर केल्यास सदर उमेदवाराची निवड रद्द करण्यात येईल.**

**३०) खुल्या प्रवर्गातील उमेदवारांनी रु. १५०/- व राखीव प्रवर्गातील उमेदवारांनी रु. १००/- चा डिमांड ड्राफट जोडणे आवश्यक आहे व डिमांड ड्राफट च्या मागे स्वतःचे नांव स्वहस्ताक्षरात लिहावे, सदरचा डिमांड ड्राफट "District Integated Health & Family Welfare Society, Amravati" यांचे नावे देय असावे.**

**३१) अर्ज केलेल्या उमेदवारांनी वेळो-वेळी *https://zpamravati.gov.in* या वेब साईटवर भेट दयावी**

| | | |
|---|---|---|
| जिल्हा आरोग्य अधिकारी<br>जिल्हा परिषद,अमरावती | जिल्हा शल्य चिकित्सक<br>जिल्हा सामान्य रुग्णालय, अमरावती | मुख्य कार्यकारी अधिकारी<br>जिल्हा परिषद, अमरावती |

Scanned with OKEN Scanner

# राष्ट्रीय आरोग्य अभियान, जिल्हा परिषद, अमरावती

## अर्जदाराच्या माहीतीचा फॉर्म दिनांक - ________________

जाहिरातीनुसार पद क्र. :- ________ (अनिवार्य)

अर्ज केलेल्या प्रवर्गाचे नाव :- ____________ (अनिवार्य)

अर्ज केलेल्या पदाचे पूर्ण नाव - ................................................................ (अनिवार्य)

- अर्जदाराचे संपुर्ण नाव - ................................................................................
- अर्जदाराचा संपुर्ण पत्ता - ................................................................................
  ................................................... पिनकोड ..................
- अर्जदाराची जन्मतारीख - ............................ जाहीरात दिनांक पर्यंतचे वय ................ वर्ष
- जात :- ............... मुळ जातीचा प्रवर्ग :- ............... (अनिवार्य)

| SC | | ST | | VJA | | NT-B | | NT-C | | NT D | | SBC | | OBC | | OPEN | | SEBC | | EWS | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|

- दुरध्वनी क्रमांक :- (१) ................................ (२) ........................................
- MS-CIT :- आहे / नाही Tally :- आहे / नाही इतर संगणक कोर्सचे नाव .........................
- तांत्रिक पदाचे रजिस्टेशन सर्टिफिकेट असल्यास नोंदणी क्र.- ..............................................
- **शैक्षणिक अर्हता**

| अ.क्र. | पदवी/ पदवीका/पदव्युत्तर पदविका किंवा पदवी | अंतीम वर्षात मिळालेल्या गुणांची टक्केवारी | शेरा |
|---|---|---|---|
| १ | | | |
| २ | | | |
| ३ | | | |
| ४ | | | |

- **अनुभव**

| अ.क्र. | शासकिय, निमशासकिय/स्थानिक स्वराज्य संस्था अथवा राष्ट्रीय आरोग्य अभियान | अनुभवाचा कालावधी | शेरा |
|---|---|---|---|
| १ | | | |
| २ | | | |
| ३ | | | |

अर्जदाराची स्वाक्षरी

---

**कार्यालयीन कामासाठी**

**पात्र/ अपात्र** तसेच अपात्र असल्यास कारण -: ..........................................................

अधिकाऱ्याची स्वाक्षरी
नाव व पदनाम

Scanned with OKEN Scanner